## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५८/२०१९** **दिनांक १९/०७/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १३/०७/२०१९ ते १९/०७/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २०/०७/२०१९ सकाळी ८:३० पासून २४/०७/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१३/०७** | **१४/०७** | **१५/०७** | **१६/०७** | **१७/०७** | **१८/०७** | **१९/०७** | | **२०/०७** | **२१/०७** | **२२/०७** | **२३/०७** | **२४/०७** |
| ७.० | ४०.० | १४.० | ०.० | ३.० | ५.६ | ०.० | **पाऊस (मिमी)** | ३३ | १६ | १३ | १४ | १० |
| ३१.६ | ३०.६ | ३०.६ | ३१.८ | ३१.६ | ३१.८ | ३२.० | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| २६.४ | २५.२ | २४.६ | २७.६ | २६.४ | २६.४ | २६.२ | **किमान तापमान (अं.से)** | २७ | २६ | २७ | २७ | २६ |
| २ | १ | २ | १ | २ | २ | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ८ | ८ | ८ | ७ |
| ९२ | ९१ | ८८ | ८५ | ८७ | ९२ | ८१ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८९ | ९२ | ९० | ९० | ९१ |
| ८१ | ८५ | ८० | ७७ | ७६ | ७१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६४ | ७९ | ७२ | ६९ | ६९ |
| ५.८ | ३.८ | ६.३ | ६.४ | ४.३ | ३.९ | २.८ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ४ | ५ | ६ | ८ | ८ |
| इ.पू. | पू. | इ.पू. | इ.पू. | इ.उ. | प. | शांत | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै.द. | प. | प. | नै.प. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ६९.६ | १७६९.० | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २० ते २४ जुलै, २०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक १९ ते २५ जुलै, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्य राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **रोप अवस्था** | • पुढील पाचही दिवस मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने भात खाचरात पाण्याची योग्य पातळी नियंत्रित करावी.<br>• पुढील पाचही दिवस मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने पाण्याच्या उपलब्धतेनुसार भात पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत.<br>• भात क्षेत्रातील बांधाची बंधीस्ती करावी तसेच बांधावरील तणांचा बंदोबस्त करावा. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • १० वर्षावरील "हापूस" जातीच्या आंबा झाडास आकारमानानुसार पॅक्लोब्युट्राझोल (कल्टार) देण्यात यावे. प्रत्येक झाडाचा पूर्व -पश्चिम व दक्षिण - उत्तर व्यास मोजून त्याची सरासरी काढून प्रति मीटर व्यासास ०.७५ ग्रॅम पॅक्लोब्युट्राझोल (३ मि.ली. कल्टार) द्यावे. पॅक्लोब्युट्राझोलची आवश्यक मात्रा ३ ते ५ लिटर पाण्यात मिसळून १० ते १२ सें.मी. खोल असे सम अंतरावर २५ ते ३० खड्डे मारून त्यात द्रावण समप्रमाणात ओतावे, नंतर खड्डे मातीने बुजवून टाकावे.<br>• <u>**टिप:**</u> पाऊसाची तीव्रता जास्त असलेल्या दिवसात पॅक्लोब्युट्राझोल देवू नये. |
| **आंबा व चिकू** | **वाढीची अवस्था** | • आंबा आणि चिकू बागेतील गवत काढून स्वच्छता करावी. गवताची कापणी विळ्याच्या/ गवत कापणी यंत्राच्या सहाय्याने करावी किंवा ग्लायफोसेट तणनाशक ३ ते ४ मी.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून गवतावर फवारणी करावी.<br><u>**टिप:**</u> तणनाशक फवारणी केलेल्या बागेत जनावरे चारविण्यासाठी सोडू नयेत.<br>• नवीन लागवड केलेल्या फळबागेतील रोपांना काठीचा आधार द्यावा. |
| **नारळ** | - | • नारळ बागेतील सुकलेल्या झावळ्या, पालापाचोळा, गवत काढून बागेत स्वच्छता ठेवावी जेणेकरून नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रण होण्यास मदत होईल तसेच गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी नारळ बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी दर दोन महिन्यांनी क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच शेड मध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• गाभण जनावरांना २.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण आणि ५ ते ७ किलो वाळलेली वैरण तसेच दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण आणि ४ ते ५ किलो वाळलेली वैरण प्रति दिन देण्यात यावी.<br>• पावसाळ्याच्या दिवसात जनावरांमध्ये जंताचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते यावेळी जनावरांना पातळ संडास होणे, खाणे कमी होणे तसेच वजन घटणे अशी लक्षणे दिसून येतात. जंताचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फेबेंडाझॉल ५ मि. ग्रॅम किंवा अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध देण्यात यावे.<br>• जनावरांना आंत्रविषार व घटसर्प रोगावरील लसीकरण करावयाचे राहिले असल्यास पशु वैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लवकरात लवकर करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**